# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७३८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/११/२०१६

**१) गैरकायदयाची मंडळी जमवुन पाठीवर मारून जखमी केल्यामुळे गुन्हा नोंद :–**

दिनांक ९/११/२०१६ रोजी ०१३१ वा. दर. यातील आरोपींतांनी सगमंत करून गैरकायदयाची मंडळी जमवुन जखमी धनपाल सुरदास मोटघरे वय ५० वर्ष रा. परसोडी यांचे सोबत घराशेजारील अंगणावरून तोंडातोंडी झगडा भांडण करून काठीने व रॉड ने पाटीवर मारून जखमी केल्याने फिर्यादी श्रीमती संगिता राहंस रामटेके वय ४५ वर्ष रा. परसोडी यांचे तोडीं रिपोर्ट व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२४,१४७ भांदवि. सहकलम ३,(२),(५) ए,अनुसुचित जामी जमाती अत्याचार अधीनियम २०१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मा.उपवीभागीय पोलीस अधीकारी श्री. संखे सा.साकोली पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत. आरापी क्र.१,२,५ हे अटक आहेत.

**२)क्षुल्लक कारनावरून भांडण करून दगडाने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ९/११/२०१६ रोजी १९.३० वा. दर. यातील फिर्यादी सोपान लाकडु भुरे वय ४५ वर्ष रा.कवडसी हा मंडई /जलसा पाहण्याकरीता गेला असता तेथील देवचंद माकडे यांचे सोबत असलेल्या व्यक्ती सोबत बोलत असता तेव्हा यातील आरोपीने 'तु माझ्या बद्‌दल देवचंद माकडे याला काय सागींतले 'असे म्हणुन भांडण करून दगडाने डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ.शेंडे पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारनावरून भांडण करून काठीने पाठीवर ,मानेवर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ९/११/२०१६ रोजी २०.३० वा. दर. यातील फिर्यादी विशाल रघुनाथ कांबळे वय ३५ वर्ष रा.बेटाळा हा व आरोपी व इतर लोक गप्पा मारीत असतांना, एकमेकाची चेष्ठा मस्करी करीत असता, यातील आरोपीला चेष्ठा मस्करी सहन न झाल्याने आरोपीने फिर्यादीस काठीने पाठीवर,मानेवर मारून जखमी केल्याने फिर्यादीचे बयान ग्रा.रू. पवनी येथे नोंदवुन व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा कटारे पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४)प्लॉट संबधी पैशाचे कारणवरून भांडण करून मारहान केल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक ११/१०/२०१६ रोजी २०.३० वा. दर. यातील फिर्यादी पुरूषोत्तम नारायन बोकडे वय ६३ वर्ष रा.प्लॉट नं. १५ (ए)(डब्लु) डायमंड सेकंड फ्लोअर सि.ए.न.४ दहीसर पुर्व मुंबई ह.मु. एस.१ शाही शंकर अपारमेंट हसन गॅरेज जवळ मोहन नगर नागपुर हे आरोपीचे वडीलांनी दिलेले पैसे प्लॉट संबधी चर्चा करण्याकरीता आरोपीचे घरासमोर गेले असतांनी यातील आरोपी यांनी कसले पैसे दयावे असे बोलुन फिर्यादी सोबत भांडण करून लाकडी दांडाने मारपीट केल्याने त्याचे डावे हाताचे मनघटाला मार लागुन एक्सरे प्लेट रिपोर्ट डिसचार्ज कार्ड सादर काल्याने व उशीरा येवुन आज रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा भंडारा पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) मुलीचा विनय भंग केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०७/११/२०१६ रोजी १३.३० वा. दर. यातील फिर्यादी ही आरोपीचे शेतातुन जात असतांना आरोपीने फिर्यादीला बोलावुन'तुझ्या थैल्यात काय आहे, तुझ्या गावची मंडई केव्हा आहे' असे, विचारून गळयात हात घालुन अश्लील चाळे ,व विनयभंग केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट व डॉ.रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३५४ (अ),(१) भांदवि.सह कलम १२ बाल.लै.अ.बा.स.अधी.२०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी इंगोले पो. स्टे. कारधा हे करीत आहेत.आरोपी अटक आहे.

**६) मोटार सायकलच्या धडकेत तिन इसम जखमी झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०७/११/२०१६ रोजी १३.००.वा. दर. यातील फिर्यादी भारत अर्जुन डाहारे वय ३० वर्ष हा त्याची मोटार सायकल क्र. एमएच ३६ ई ३२२० ने डबलसीट कर्कापुर रोडने जात असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल हईगयिने व निष्काळजीपने चालवुन मोटार सायकलला समोरून धडक दिल्याने फिर्यादी व फिर्यादीचा भावुजी व आरोपी स्वःता जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीने आज रोजी रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २७९,३३७ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा डोंगरे पो. स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**७) अवैध दारु अडयांवर धाडी . :—**

दिनांक १०/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, वरठी, सिहोरा,साकोली ,लाखनी येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ६५ लिटर हातभट्टी दारु + साहीत्य कि. ६१०१/—रू. व ७५० लिटर देशी दारू कि.२००/रू. असा एकुण कि.६३०१ /—रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

( बि.आर. गाडे )
**पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र.९४२२८३२१७८**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.